# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

**सभा व दप्तर कक्ष**

---

ज्ञानगंगा घरोघरी

# नियोजन मंडळ बैठक

## कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 46 |
| स्थळ | : | **प्रशासकीय इमारत विद्यापीठ सभागृह (Offline/Online)** |
| दिनांक | : | मंगळवार 29 जुलै 2025 |
| वेळ | : | सकाळी 11 : 30 वाजता |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

**सभा व दप्तर कक्ष**

ज्ञानगंगा घरोघरी

# नियोजन मंडळ बैठक

## कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 46 – **पुरवणी बैठक** |
| स्थळ | : | **प्रशासकीय इमारत विद्यापीठ सभागृह (Offline/Online)** |
| दिनांक | : | सोमवार, 11 ऑगस्ट 2025 |
| वेळ | : | सकाळी 11 : 30 वाजता |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

## 46वी नियोजन मंडळ बैठक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या नियोजन मंडळाची 46 वी बैठक (ऑनलाईन व ऑफलाईन) पद्धतीने मंगळवार, दि. 29 जुलै 2025 रोजी सकाळी 11.30 वा. आणि याच बैठकीची पुरवणी बैठक 11 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 11.30 वा. आयोजित करण्यात आली होती. सदर दोनही बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | अध्यक्ष |
| 02 | मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, मा. प्र-कुलगुरू आणि संचालक, बहुविद्याशाखीय विद्याशाखा | सदस्य |
| 03 | मा. डॉ. जयदीप निकम, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा आणि मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकास विद्याशाखा | सदस्य |
| 04 | डॉ. राम ठाकर, सहयोगी प्राध्यापक, निरंतर शिक्षण विद्याशाखा | सदस्य |
| 05 | डॉ. अरविंद चौधरी, जळगाव, ऑनलाईन उपस्थित | सदस्य<br>ऑनलाईन उपस्थित |
| 06 | डॉ. मधुकर शेवाळे, संचालक, अंतर्गत गुणवत्ता व आश्वासन कक्ष आणि नियोजन व सुसुत्रीकरण केंद्र | सदस्य |
| 07 | मा. डॉ. नागार्जुन वाडेकर, संचालक, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा आणि संचालक, भाषा साहित्य व सांस्कृतिक अभ्यास विद्याशाखा | निमंत्रित सदस्य |
| 08 | मा. डॉ. सुरेंद्र पाटोळे, संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | निमंत्रित सदस्य |
| 09 | मा. डॉ. माधुरी सोनवणे, संचालक, कृषी विज्ञान विद्याशाखा | निमंत्रित सदस्य |
| 10 | मा. डॉ. चेतना कामळसकर, संचालक, विज्ञान विद्याशाखा | निमंत्रित सदस्य |
| 11 | मा. डॉ. कविता साळुंके, संचालक, ऑनलाईन एज्युकेशन विद्याशाखा | निमंत्रित सदस्य |
| 12 | श्री. कैलास मोरे, संचालक, ग्रामीण विकास उद्योजकता विद्याशाखा | निमंत्रित सदस्य |
| 13 | डॉ. सज्जन थूल, संचालक, मूल्यमापन केंद्र | निमंत्रित सदस्य |
| 14 | डॉ. प्रकाश देशमुख, संचालक, विद्यार्थी सेवा विभाग | निमंत्रित सदस्य |
| 15 | मा. डॉ. दयाराम पवार, प्रमुख विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्र | निमंत्रित सदस्य |
| 16 | श्री. अभिषेक देशमुख | निमंत्रित सदस्य |
| 17 | मा. वित्त अधिकारी, वित्त विभाग | निमंत्रित सदस्य |
| 18 | मा. दिलीप भरड | सदस्य-सचिव |

वेगवेगळ्या विद्याशाखांचे विषय नियोजन मंडळापुढे सादर करताना संबंधित विद्याशाखांचे संचालक नियोजन मंडळाच्या मा. कुलगुरुंच्या निर्देशानुसार सभेत निमंत्रित सदस्य म्हणून निमंत्रित करण्यात आले होते.

पुढील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. श्री. दत्तात्रय व्ही. जाधव, टेक्निकल एज्युकेशन, पुणे | सदस्य |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगा घरोघरी

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

## 46वी नियोजन मंडळ बैठक आणि याच बैठकीची पुरवणी बैठक

## कार्यवृत्त

**मंगळवार 29.07.2025** — **सकाळी 11:30 वाजता**
**सोमवार 11.08.2025** — **सकाळी 11.30 वाजता**

| विषय क्रमांक | | तपशील |
|---|---|---|
| 46.1.0 | | बैठकीसाठी ऑनलाईन\ऑफलाईन असलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचे नियोजन अधिकारी श्री. मधुकर शेवाळे यांनी स्वागत केले. |
| | | 1. मा. कुलगुरू तथा अध्यक्ष यांनी बैठकीसाठी प्रत्यक्ष ऑनलाईन उपस्थित असलेले डॉ. अरविंद चौधरी सरांचे तसेच ऑफलाईन उपस्थित सदस्य व निमंत्रित सदस्यांचे स्वागत केले.<br>2. नियोजन मंडळाच्या बैठकीला सुरुवात करण्यापूर्वी विद्यापीठाच्या प्रगतीबद्दल तसेच नियोजनाबद्दल सर्व सन्माननीय सदस्यांना अवगत करून दिले.<br>3. विद्यापीठाच्या सर्व विद्याशाखांकडून राष्ट्रीय धोरण 2020 नुसार शिक्षणक्रमांची पुनर्रचना करण्याचे काम सुरू आहे. त्यानुसार या वर्षापासून बी.कॉम. शिक्षणक्रम सुरू करण्यात आला आहे. पुढील वर्षापासून बी.ए. सुरू होईल.<br>4. विद्यापीठाच्या महाराष्ट्रभराच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या जिल्ह्यापासून विभागीय केंद्राचे अंतर दूर असते. त्यामुळे त्यांना विद्यापीठापर्यंत पोहोचता येत नाही आणि सुयोग्य सुविधा देता येत नाही. ही अडचण दूर करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एक जिल्हा केंद्र असावे या उद्देशाने विद्यापीठाने प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळालाय आणि मिळतोय. विद्यापीठाचे बारामती जिल्हाकेंद्राच्या धर्तीवर विविध जिल्हाकेंद्र स्थापन करण्याचे विद्यापीठाचे प्रयत्न सुरू आहेत.<br>5. मराठी भाषा विकासासाठी मा. मंत्री उदय सावंत यांचेकडून विद्यापीठाला संधी देण्यात आली आहे. त्यांनी या प्रयोगासाठी विद्यापीठाला जागा दिली आणि तिथे मराठी भाषा विकास व संशोधन केंद्र उभारणीसंबंधीचे नियोजित आहे.<br>6. J.N.P.T. यांचेसोबतचा ड्रायव्हर्ससाठीच्या शिक्षणक्रमाचे उद्घाटन 15 ऑगस्ट रोजी करण्यात येऊन शिक्षणक्रम सुरू होईल. पहिल्या टप्प्यासाठी J.N.P.T. कडून 10 कोटी रुपयांची देणगी प्राप्त होणार आहे.<br>7. MPSC, UPSC अशा स्पर्धा परीक्षांसाठीच्या मार्गदर्शनासाठी 'चाणक्य' च्या धर्तीवर बी.ए. शिक्षणक्रम सुरू करता येईल. त्याचे syllabus तयार झाल्यानंतर Physicswala यांचेबरोबर सामंजस्याने हा शिक्षणक्रम राबविता येईल असे विचार मा. कुलगुरूंनी मांडले.<br>8. अशा विविध क्षेत्रांमध्ये विद्यापीठाची वाटचाल सुरू आहे. विविध प्रकल्प नियोजित आहेत. यासाठी सन्माननीय सदस्यांनी मा. कुलगुरूंचे अभिनंदन केले. |
| 46.2.0 | 46.2.1 | दि. 02 जुलै 2024 रोजी झालेल्या 45 व्या नियोजन मंडळ बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.<br>**ठराव** – सदस्य सचिव श्री. भरड यांनी 45 व्या नियोजन मंडळ बैठकीतील कार्यवृत्त सदस्य सचिव श्री. भरड यांनी वाचून दाखविले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | 46.2.2 | दि. 02 जुलै 2024 रोजी झालेल्या 45 व्या नियोजन मंडळ बैठकीतील निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल.<br>**ठराव** – सदस्य सचिव श्री. भरड यांनी 45 व्या नियोजन मंडळ बैठकीतील निर्णयावरील कार्यवाहीचा सादर केला. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 46.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 46.3.1<br>नियोजन अधिकारी | **विद्यापीठाचा दशवार्षिक विकास आराखडा 2025-26 (University Prospective Plan 2025-35) आणि विद्यापीठ विकास आराखडा (Institutional Development Plan) हे दोन अहवाल नियोजन मंडळापुढे अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी** – विद्यापीठाचा दशवार्षिक विकास आराखडा 2025-26 (University Prospective Plan 2025-26) व विद्यापीठ विकास आराखडा (Institutional Development Plan) याबाबत डॉ. राजन वेळूकर यांचे अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दोन्ही अहवाल सादर केले असून सदर अहवाल नियोजन मंडळापुढे अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** – विद्यापीठाचा दशवार्षिक अहवाल विद्यापीठ अनुदान आयोगाला पाठवावा लागतो. त्यासाठी मा. डॉ. राजन वेळूकर यांचे अध्यक्षतेखाली 9 तज्ज्ञांची समिती गठीत करण्यात आली होती. समितीमध्ये मा. महेश झगडे, मा. हनुमंतराव गायकवाड, प्रा. मंजुलिका श्रीवास्तव, मा. पोपटराव पवार, मा. प्रा. रमेश वरखेडे, मा. प्रा. संजय चाकणे, मा. प्रा. विश्वास गायकवाड. मा. डॉ. राम ठाकर, मा. डॉ. प्रकाश देशमुख यांचा समावेश करण्यात आला होता.<br>आराखडा तयार करताना पुढील गोष्टी विचारात घेतल्या होत्या.<br>1. विद्यापीठ अनुदान आयोगाची मार्गदर्शक तत्वे, मुक्त विद्यापीठाची संकल्पना यांचा विचार करण्यात आला आहे.<br>2. विद्यापिठातील सर्व विद्याशाखांकडून माहिती मागवून तसेच सध्याच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा विचार करून, भविष्यातील शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन, संशोधनात्मक अभ्यासक्रमांचा अंतर्भाव, गरजांनुसार नवीन विद्याशाखांची निर्मिती, नवीन तंत्रज्ञानाचा वापर (AI, स्वयं, महास्वयंम) अशा अनेक मुद्यांवर भर देण्यात आला आहे.<br>3. आराखड्यात विद्यार्थी संख्या वाढीवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. त्यासाठी विभागीय केंद्रे, अभ्यासकेंद्रांचा विस्तार, जिल्हा केंद्रांची निर्मिती, रोजगाराभिमुख शिक्षणक्रम, स्वयंरोजगार शिक्षणक्रम, संशोधन व नवोपक्रमाला प्राधान्य दिले आहे.<br>4. विद्यापीठाच्या डॉ. राम ताकवले संशोधन केंद्रामार्फत संशोधन शिक्षणक्रमांची निर्मिती, शासनाच्या विविध योजनांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि त्याचा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष फायदा होण्यासाठी विद्याशाखांचा सहभाग, विविध औद्योगिक क्षेत्रांशी सामंजस्य करार, प्रभावी सुधारित सॉफ्टवेअर, पायाभूत सुविधांची निर्मिती, शिक्षणक्रमांच्या गुणवत्तेचे मूल्यमापन करण्यासाठी संबंधित समित्यांवर उद्योग क्षेत्रांतील व्यक्तींचा समावेश वाढवावा अशा सुचनाही आराखड्यात केल्या आहेत.<br>5. आराखड्यात स्वयंमच्या (Swyam) धर्तीवर 27 ऑनलाईन पदवी शिक्षणक्रम प्रस्तावित केले आहेत.<br>6. भौतिक व डिजीटल infrastructure वाढीसाठी बृह्द आराखड्यात महत्त्व दिले असून हे विद्यार्थी संख्यावाढीसाठी आवश्यक आहे.<br>7. सर्व समावेशक आराखडा मराठी व इंग्रजी भाषेतून तयार केला आहे. आराखड्याविषयीची माहिती समितीचे सदस्य डॉ. राम ठाकर आणि समितीचे सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | | सचिव डॉ. प्रकाश देशमुख यांनी नियोजन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांना अवगत करून दिली. मराठी भाषेतून आपला दशवार्षिक आराखडा तयार करणारे मुक्त विद्यापीठ हे पहिले विद्यापीठ आहे अशी माहिती समिती यांनी सादर केली. या आराखड्याप्रमाणे विद्यापीठाने वाटचाल केल्यास निश्चितच विद्यापीठाची गुणवत्ता वाढून विद्यापीठाचा नावलौकिक वाढेल असे आराखड्यात सुचित केले आहे.<br>आराखड्याचे विवेचन ऐकून सन्माननीय सदस्य डॉ. अरविंद चौधरी यांनी सर्व समितीचे आणि डॉ. देशमुख, डॉ. ठाकर यांचे अभिनंदन केले. आराखड्यात मांडलेल्या सुचनांची अंमलबजावणी विद्यापीठाच्या भविष्याच्या दृष्टीने फायदेशीर राहील असे विचार मांडले. औद्योगिक क्षेत्रातील वेगवेगळ्या प्रांतातून आलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना मराठी भाषा शिकण्याची संधी देता येईल तसेच मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करण्याची संधी विद्यापीठाला मिळालीय. तसेच औद्योगिक क्षेत्रातील गरजेनुसार प्रमाणपत्र शिक्षणक्रम विद्यापीठाने सुरु करावेत अशी सुचना मांडली.<br>आराखडा तयार करताना कोणकोणत्या क्षेत्रांची मते विचारात घेतली असे मा. अरविंद चौधरी सरांनी विचारले असता विद्यापीठातील विद्याशाखा संचालक, समाजातील तज्ज्ञ व्यक्ती, अभ्यासकेंद्रे प्रमुख, माजी विद्यार्थी यांच्याकडून प्रश्नावली भरून घेऊन त्यांचा आराखड्यात समावेश केल्याचे डॉ. चौधरी सरांना अवगत करून देण्यात आले. त्यावर मा. डॉ. अरविंद चौधरी यांनी समाधान व्यक्त करून सर्वांची दूरदृष्टी विचारात घेऊन तयार केलेला आराखडा सक्षम असणारच असे नमूद करून पुनश्च सर्व समिती सदस्यांचे अभिनंदन केले.<br>भविष्यातील विविध कौशल्यांची आवश्यकता भासणार असून ही गरज पूर्ण व्हावी यासाठी विद्यापीठातील व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखेमार्फत NCVET कडे Duel Body दर्जा प्राप्त व्हावा याकरीता मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केलेला असून जो लवकरच मान्य होईल असा विश्वास मा. कुलगुरू यांनी यावेळी व्यक्त केला.<br>आराखड्यासंबंधी झालेल्या चर्चेवर समाधान व्यक्त करून मा. नियोजन मंडळासमोर मांडलेला बृह्द आराखडा सर्वानुमते स्वीकारून पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 46.3.2<br>विज्ञान<br>विद्याशाखा | **विज्ञान विद्याशाखेमार्फत सन 2024-25 मध्ये राबविण्यात आलेले शिक्षणक्रम व कार्यवाही तसेच 2025-26 या वर्षात नव्याने सुरू करावयाच्या शिक्षणक्रमांची यादी मा. नियोजन मंडळाच्या अवलोकन व मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – विज्ञान विद्याशाखेमार्फत 2024-25 मध्ये राबविण्यातआलेल्या व 2025-26 या सुरू करण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांच्या खालील मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी व मान्यतेसाठी मा. नियोजन मंडळासमोर सादर....<br>1) Item PB/SOS/01/2025: Action Taken related to programmes on offer during Academic year 2024-2025.<br>2) Item PB/SOS/02/2025: Approval to New programmes to be launched from A.Y.2025-26.<br>3) Item PB/SOS/03/2025: New Learner Support Centre (LSC) Recognition Policy.<br>4) Item PB/SOS/04/2025: Planning regarding Teaching/ Learning/ Evaluation.<br>5) Item PB/SOS/05/2025: Approval to PPF, PDF and PPR forms for New. programmes launched from A.Y. 2024-25 and to be launched from A.Y. 2025-26<br>6) Item PB/SOS/06/2025: Planning regarding Academic Programmes |

| | | |
|---|---|---|
| | | ठराव —<br>1. विज्ञान विद्याशाखेमार्फत शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये B.Sc. (Botany, Chemistry, Zoology) हा पदवी शिक्षणक्रम तसेच NEP2020 नुसार M.Sc. (Mathematics, Environmental Science, Physics, Chemistry, Zoology, Botany) असे 6 पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम सुरू करण्यात आले होते. शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये सदरील पदवी शिक्षणक्रमाच्या तिसऱ्या वर्षाच्या आणि पदव्युतर पदवी शिक्षणक्रमांच्या दुसऱ्या वर्षाच्या उर्वरित अभ्यासक्रमांचे Study Material यशस्वीरित्या विकसित झाले आहे.<br>2. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या मार्गदर्शक तत्वानुसार शैक्षणिक वर्ष 2025-26 पासून नव्याने राबविण्यात येणाऱ्या UGC-DEB मान्यताप्राप्त B.Sc. (Honours) (Environmental Science) आणि M.Sc. (Mathematics with Computer Applications) या शिक्षणक्रमांसाठीच्या PPR, PPF, PDF Forms ला नियोजन मंडळाने मान्यता प्रदान केली.<br>3. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या मार्गदर्शक तत्वानुसार B.Sc. (Honours) (Physics), B.Sc. (Honours) (Chemistry), B.Sc. (Honours) (Mathematics), B.Sc. (Honours) (Botany), B.Sc. (Honours) (Zoology) हे 4 वर्ष कालावधीचे नविन सुधारित शिक्षणक्रम शैक्षणिक वर्ष 2026-27 पासून सुरु करण्यास व या शिक्षणक्रमांसाठी नजिकच्या काळात UGC-DEB मान्यतेस अर्ज सादर करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदरील शिक्षणक्रमांसाठीच्या PPR, PPF, PDF आणि PRF Forms ला नियोजन मंडळाने मान्यता प्रदान केली.<br>4. M.Sc. (Mathematics with Computer Applications) हा शिक्षणक्रम ऑनलाईन पद्धतीने सुरू करण्यासही मान्यता प्रदान केली.<br>तसेच सर्व विद्याशाखांनी त्यांच्या जूनपासून नव्याने सुरू करावयाच्या तसेच सुधारित शिक्षणक्रमांसाठी नव्याने UGC-DEB मान्यतेसाठी जानेवारीतच अर्ज सादर करावेत, म्हणजे जूनपर्यंत मान्यता प्राप्त होऊन जुलैपासून शिक्षणक्रम सुरू करण्यात अडचण येणार नाही अशी सूचना करण्यात आली. |
| | 46.3.3<br>स्कूल ऑफ डिजिटल एज्युकेशन आणि प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र | **डिजीटल एज्युकेशन आणि प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र या विद्याशाखेमार्फत सन 2024-25 मध्ये राबविण्यात आलेले शिक्षणक्रम व कार्यवाही तसेच 2025-26 या वर्षात नव्याने सुरू करावयाच्या शिक्षणक्रमांची यादी मा. नियोजन मंडळाच्या अवलोकन व मान्यतेस्तव सादर.....**<br>**टिपणी** — डिजीटल एज्युकेशन आणि प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र या विद्याशाखेमार्फत 2024-25 मध्ये राबविण्यात आलेल्या व 2025-26 या शैक्षणिक वर्षात सुरू करण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांच्या खालील मुद्यांवर चर्चा करण्यासाठी व मान्यतेसाठी मा. नियोजन मंडळासमोर सादर....<br>1. शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये 'सायबर सिक्युरिटी' आणि विहान अनुसंधान हे शिक्षणक्रम सुरू करण्यात आले. 'सायबर सिक्युरिटी' या शिक्षणक्रमासाठी 7826 आणि विहानअनुसंधानसाठी 17 विद्यार्थी प्रवेशित झाले आहे.<br>2. शैक्षणिक वर्ष 2025-26 मध्ये विद्याशाखेमार्फत 'IKS', 'मूल्यशिक्षणाची मूलतत्त्वे : मुलभूत (Online)', 'Cyber Security', विहान अनुसंधान, 'IBM Certificate Program in Generative AI & Prompt Engineering — B Arts' आणि 'IBM Certificate programme in generative AI & Prompt Engineering — B.Com.' हे शिक्षणक्रम ऑनलाईन सुरू करण्यात आले आहे व परस बाग प्रमाणपत्र शिक्षणक्रम हा शिक्षणक्रम ऑफलाईन सुरू करण्यात आला असून या शिक्षणक्रमाची 33 अभ्यासकेंद्र कार्यान्वित आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | **ठराव** – स्कूल ऑफ डिजिटल एज्युकेशन आणि प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र हे दोन वेगवेगळे विभाग आहेत. डिजिटल एज्युकेशन ही विद्याशाखा आहे तर प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र हे केंद्र आहे. संशोधन व विकास केंद्रामार्फत फक्त संशोधनाशी संबंधित अभ्यासक्रम राबविण्यात यावेत.<br>ऑनलाईनमार्फत 2025-26 पासून राबविण्यात येणाऱ्या M.A. English, M.B.A, B.C.A., M.C.A या चार शिक्षणक्रमांचे अध्ययन साहित्याचे विकसन Physicswala यांचेमार्फत सुरू आहे जानेवारीपर्यंत पूर्ण होतील. तसेच English for Communication, Accountancy and Taxation, Basics of Agriculture या तीन प्रमाणपत्र शिक्षणक्रमांचे अध्ययन साहित्य जानेवारी पर्यंत Physicswala यांचेकडून प्राप्त होईल.<br>महाज्ञानदिपसाठी 5 शिक्षणक्रम देण्यात आले आहे. 2025-26 पासून राबविण्यात येणाऱ्या प्रमाणपत्र शिक्षणक्रमांना मा. नियोजन मंडळाने मान्यता प्रदान केली. |
| | 46.3.4<br>निरंतर शिक्षण विद्याशाखा | **निरंतर शिक्षण विद्याशाखेमार्फत सन 2024-25 मध्ये राबविण्यात आलेले शिक्षणक्रम व कार्यवाही तसेच 2025-26 या वर्षात नव्याने सुरू करावयाच्या शिक्षणक्रमांची यादी मा. नियोजन मंडळाच्या अवलोकन व मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – निरंतर शिक्षण या विद्याशाखेमार्फत 2024-25 मध्ये राबविण्यात आलेल्या व 2025-26 या सुरू करण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांच्या खालील मुद्यांवर चर्चा करण्यासाठी व मान्यतेसाठी मा. नियोजन मंडळासमोर सादर....<br>• सन 2024-25 या वर्षी राबविण्यात आलेले शिक्षणक्रम<br>• सन 2025-26 या वर्षी नव्याने सुरू करण्यात येणारे शिक्षणक्रम<br>• नव्याने द्यावयाची अभ्यासकेंद्रे यासंबंधीचे धोरण – नव्याने अभ्यासकेंद्रे सुरू करण्यासाठी अभ्यासकेंद्रांकडून Recognition As A Study Centre : Process Manual प्रमाणे कागदपत्रांची फाईल विद्याशाखेत मागविण्यात येते, सदर फाईलची पुर्ण चौकशी (Scrutiny) करून ऑनलाईन किंवा ऑफलाईन तपासणी (Inspection) करून त्यांना मान्यता देण्यात येते.<br>**ठराव** – निरंतर शिक्षण या विद्याशाखेमार्फत 2024-25 मध्ये सुरू करण्यात आलेल्या प्रमाणपत्र आणि पदविका शिक्षणक्रमांची माहिती नियोजन मंडळाला अवगत करून देण्यात आली. 2025-26 या या वर्षातील प्रस्तावित B.Sc. Media Graphics and Animation (restructure) , B.Sc. Hospitality Studies आणि B.Sc. Fire and Industrial Safety (Honors) या शिक्षणक्रम सुरू करण्यासाठी आणि B.Sc. Media Graphics and Animation या शिक्षणक्रमासाठी अभ्यासकेंद्रे देताना वेगळे (प्रात्यक्षिक आणि कार्यकेंद्र) आधारित निकष तयार करण्यात आले. निरंतर शिक्षण विद्याशाखेने प्रस्तावित केलेल्या वरील नवीन शिक्षणक्रमांना आणि अभ्यासकेंद्र निकषांना नियोजन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 46.3.5<br>वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | **वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेमार्फत सन 2024-25 मध्ये राबविण्यात आलेले शिक्षणक्रम व कार्यवाही तसेच 2025-26 या वर्षात नव्याने सुरू करावयाच्या शिक्षणक्रमांची यादी मा. नियोजन मंडळाच्या अवलोकन व मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – वाणिज्य व व्यवस्थापन या विद्याशाखेमार्फत 2024-25 मध्ये राबविण्यात आलेल्या व 2025-26 या सुरू करण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांच्या खालील मुद्यांवर चर्चा करण्यासाठी व मान्यतेसाठी मा. नियोजन मंडळासमोर सादर....<br>• सन 2024-25 यावर्षी राबविण्यात आलेले शिक्षणक्रम – MBA, M.Com., BBA, BA-FSM, B.Com., BBA- Accounting & Financial Management , 14 Diploma Courses & 3 Certificate Course – list attached<br>• सन 2025-26 यावर्षी नव्याने सुरू करण्यात येणारे शिक्षणक्रम - NA<br>नव्याने द्यावयाची अभ्यासकेंद्रे या संबंधीचे धोरण – New LSC's for all the programs will be recognized as per UGC norms for A.Y. 2025-26 (as per attached)<br>**ठराव** – शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये राबविण्यात आलेल्या MBA, M.Com, BBA, BA-FSM, B.Com., BBA – Accounting & Financial Management पदवी, DCM, DCM – |

| | | |
|---|---|---|
| | | Banking, 14 Diploma Courses & 'MACCIA' यांचे समवेत राबविण्यात येणारे 3 Certificate Course यांच्या कार्यवाहीचा अहवाल सादर केला.<br>2025-26 मध्ये कोणतेही नवीन शिक्षणक्रम सुरू करण्यात आलेले नाहीत. शैक्षणिक वर्ष 2026-27 पासून BBA Port Management हा शिक्षणक्रम राबविण्यात येणार आहे.<br>वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत शैक्षणिक वर्ष 2025-26 मध्ये राबविण्यात येणाऱ्या MBA, M.Com., B.Com., BBA - Accounting & Financial Management. BA-FSM, BBA – Event Management, Diploma in Event Management, Diploma in AHTTM इत्यादी शिक्षणक्रमांच्या नवीन अभ्यासकेंद्रांच्या निकषांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 46.3.6<br>व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखा | **व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखेमार्फत 2025-26 या शैक्षणिक वर्षात राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांची यादी मा. नियोजन मंडळाच्या अवलोकन व मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी** - व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखेमार्फत 2025-26 या शैक्षणिक वर्षात सुरू करण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांच्या खालील मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी व मान्यतेसाठी मा. नियोजन मंडळासमोर सादर....<br>1. Certificate in Fundamentals of Wind Energy & Turbine Technology, Certificate in Wind Farm Safety and Compliances, Certificate on Solar PV Technology & Installation, Certificate in Repair & Maintenance of Heavy Earthmoving Machines, Diploma in Solar PV Technology Operations and Maintenance, Diploma in Renewable Energy Safety Inspectors & Operation Managers, Advanced Diploma in Wind Technology & Management हे शिक्षणक्रम सुरू करण्यात येणार आहे.<br>2. रस्ते वाहतुक व सुरक्षा प्रमाणपत्र शिक्षणक्रमदेखील विद्याशाखेंतर्गत विकसित करण्यात येत आहे, त्यासाठी JNPA सोबत करार करून 15 ऑगस्टपासून सुरू करण्यात येणार आहे.<br>वरील शिक्षणक्रमांसाठी पुणे व नाशिक येथे प्रत्येकी एक अभ्यासकेंद्रास पाहणी करून मान्यता देण्यात आली आहे.<br>**ठराव** – व्यावसायिक शिक्षण कौशल्य विकास विद्याशाखा नवीन स्थापन झालेली आहे. 2025-26 पासून 4 प्रमणपत्र शिक्षणक्रम आणि 3 पदविका शिक्षणक्रम सुरू करण्यात आले आहे. त्यांच्या प्रवेशप्रक्रिया सुरू झाली आहे. Certificate in Fundamentals of Wind Energy & Turbine Technology, Certificate in Wind Farm Safety and Compliances, Certificate on Solar PV Technology & Installation या प्रमाणपत्र शिक्षणक्रमांसाठी पुण्याच्या कंपनीबरोबर सामंजस्य करार करून त्यांचेकडून सिलॅबस, अध्ययनसाहित्य तयार करण्यात आले आहे. Certificate in Repair & Maintenance of Heavy Earthmoving Machines हा शिक्षणक्रम महायान ग्लोबलबरोबर सुरू करण्यात आला आहे. तसेच Nova Maritime Institute सोबत करार Port Management Sector मधील Port Management Hospitality आधारीत प्रमाणपत्र 2025-26 पासून सुरू करण्यात येणार आहेत. व्यावसायिक शिक्षण कौशल्य विकास विद्याशाखेच्या सर्व शिक्षणक्रमांच्या आराखड्याला विद्याशाखा परिषदेने दिलेल्या मान्यतेला नियोजन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 46.3.7<br>ग्रामीण विकास व उद्योजकता विद्याशाखा | **ग्रामीण विकास व उद्योजकता विद्याशाखा या नावाने एप्रिल 2025 मध्ये स्थापन झालेल्या विद्याशाखेमार्फत 2025-26 या वर्षात नव्याने सुरू करावयाच्या शिक्षणक्रमांची यादी नियोजन मंडळाच्या अवलोकन व मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी** – ग्रामीण विकास व उद्योजकता विद्याशाखा या नावाने एप्रिल 2025 मध्ये स्थापन झालेल्या विद्याशाखेमार्फत 2025-26 या वर्षात नव्याने सुरू करावयाच्या शिक्षणक्रमांची यादी नियोजन मंडळाच्या अवलोकन व मान्यतेस्तव सादर....<br>लोककायदा साथी शिक्षणक्रम (Paralegal Educator), सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य कौशल्य (Sarpanch, Deputy Sarpanch and Gram Panchayat Member Skills), राष्ट्रीय |

| | | |
|---|---|---|
| | | सेवा योजना कौशल्य (National Service Scheme Skills), सामाजिक उत्तरदायित्व आणि समुदाय सहभाग मूलतत्त्वे (Foundation of Social Responsiility and community Engagement), उद्योजकता विकास आणि स्वयंसहाय्यता गट दप्तर व्यवस्थापन (Record Keeping & Entrepreneurship Development of Self-help Group), प्रकल्प व्यवस्थापक कौशल्य (Project Manager Skills) हे प्रमाणपत्र 2025-26 पासून सुरू करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.<br>राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार बी. ए. ग्रामीण विकास व एम.ए. विकास अभ्यासक्रम हे पदवी शिक्षणक्रम 2025-26 पासून सुरू करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.<br>**ठराव** – ग्रामीण विकास व उद्योजकता विद्याशाखेने प्रस्तावित केलेल्या शिक्षणक्रमांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यतेच्या यादीत तपासून घेण्याची सूचना करण्यात आली व प्रस्तावित शिक्षणक्रमांना सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 46.3.8<br>कृषी विज्ञान विद्याशाखा | **कृषिविज्ञान या विद्याशाखेमार्फत सन 2024-25 मध्ये राबविण्यात आलेले शिक्षणक्रम व कार्यवाही तसेच 2025-26 या वर्षात नव्याने सुरू करावयाच्या शिक्षणक्रमांची यादी मा. नियोजन मंडळाच्या अवलोकनार्थ सादर.....**<br>**टिपणी** - कृषी विज्ञान या विद्याशाखेमार्फत 2024-25 मध्ये राबविण्यात आलेल्या व 2025-26 या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांच्या खालील मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी व मान्यतेसाठी मा. नियोजन मंडळासमोर सादर....<br>1. सन 2024-25 या वर्षी राबविण्यात आलेले शिक्षणक्रम व त्याअनुषंगाने केलेली कार्यवाही<br>2. सन 2025-26 या वर्षी नवीन शैक्षणिक धोरणानुसार नव्याने सुरू करण्यात येणारे शिक्षणक्रम तसेच मागील शिक्षणक्रमात करण्यात येणारे बदल<br>सद्य:स्थितीत अभ्यासकेंद्रे, नव्याने द्यावयाची अभ्यासकेंद्रे या संबंधीचे धोरण<br>**ठराव** – 2024-25मध्ये राबविण्यात आलेल्या प्रमाणपत्र आणि पदविका शिक्षणक्रमांसंबंधीत मांडलेल्या अहवालाला मा. नियोजन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| 46.4.0 | | **मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळेचे विषय** |
| | 46.4.1<br>परीक्षा विभाग | **शैक्षणिक वर्ष 2025-26 चे शैक्षणिक वेळापत्रक मा. नियोजन मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** - विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक, अंतिम प्रवेशाची दिनांक, उद्बोधन सत्र (Induction Programme), समंत्रण सत्रे (Contact Session) कालावधी, गृहपाठ सादरीकरणाच्या तारखा, परीक्षा अर्ज सादर करण्याच्या तारखा, परीक्षेचा संभाव्य कालावधी इत्यादी बाबींच्या समावेशासह शैक्षणिक वर्ष 2025-26 चे शैक्षणिक वेळापत्रक मा. नियोजन मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** – विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक, अंतिम प्रवेशाची दिनांक, उद्बोधन सत्र (Induction Programme), समंत्रण सत्रे (Contact Session) कालावधी, गृहपाठ सादरीकरणाच्या तारखा, परीक्षा अर्ज सादर करण्याच्या तारखा, परीक्षेचा संभाव्य कालावधी इत्यादी बाबींच्या समावेशासह शैक्षणिक वर्ष 2025-26चे शैक्षणिक वेळापत्रक मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेसाठी सादर केले. विद्वत परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी सादर केलेल्या शैक्षणिक वेळापत्रकास मान्यता प्रदान केली. विद्वत परिषदेने मान्य केलेल्या शैक्षणिक वेळापत्रकास मा. नियोजन मंडळाने कार्योत्तर मान्यता प्रदान केली. |
| | 46.4.2<br>मानव्यविद्या व सामाजिक | **मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा संचालक यांनी सभेच्या सुचनापत्रातील मसुद्यामुळे विद्याशाखेशी संबंधित नियोजन मंडळात ठेवावयाचे विषय ठेवता आले नाहीत याबाबत माहिती दिली** |

| | | |
|---|---|---|
| | शास्त्रे विद्याशाखा | **टिपणी** – सभा व दप्तर कक्षाकडून मा. कुलसचिवांच्या स्वाक्षरीने विद्याशाखांना पाठविण्यात आलेल्या नियोजन मंडळाच्या सभेच्या सुचनेच्या परिपत्रकातील मसुद्यात स्पष्टता नसल्याने सभेपुढे ठेवावयाचे विषय ठेवता आले नाहीत अशी माहिती दिली. त्यामुळे यानंतरही एक सभा घेण्याचे प्रस्तावित केले.<br>**ठराव** – सभा व दप्तर कक्षामार्फत मा. कुलसचिवांच्या स्वाक्षरीने पाठविण्यात आलेल्या परिपत्रकातील मसुद्यामुळे विद्याशाखांना त्यांचे विषय नियोजन मंडळापुढे मांडता आले नाहीत. मा. संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा यांनी प्रस्तावित केल्यानुसार ह्याच नियोजन मंडळाची ह्याच बैठकीची संलग्न बैठक पुढील तारीख घेऊन आयोजित करण्याची सुचना मा. कुलगुरूंनी केली. तसेच बैठकीबाबतचे परिपत्रक काढताना परिपत्रकातील मसुदा सुस्पष्ट आशयाचा असावा अशीची सुचना केली. पुढील बैठक ही संलग्न बैठक असली तरी विद्याशाखांनी नव्याने सुरू केलेल्या शिक्षणक्रमांचे PDF Forms, PPR Forms तसेच ज्या शिक्षणक्रमांचे शुल्क रु. 30 ते 40 हजारापेक्षा जास्त आहे त्याचे वित्त समितीतून मान्य होऊन आले नाहीत असे संबंधित मंडळाच्या मान्यतेशिवायचे विषयही या बैठकीच्या संलग्न बैठकीत समाविष्ट करण्याची सूचना करण्यात आली. सर्व सन्माननीय सदस्यांनी संलग्न बैठकीच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता दिली. |
| | 46.4.3<br>मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा<br>सर्व विद्याशाखा<br>विद्यार्थी सेवा विभाग | **सद्यस्थितीतील अभ्यासकेंद्रे आणि नव्याने देण्यात येणाऱ्या अभ्यासकेंद्रांचे धोरण यांचा विषय मा. नियोजन मंडळाच्या मान्यतेसमोर सादर...**<br>**टिपणी** – सर्व विद्याशाखांसाठी सद्यस्थितीतील अभ्यासकेंद्रांबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निकषांनुसार अभ्यासकेंद्र मान्यतेच्या कार्यवाहीचा आणि अभ्यासकेंद्रांच्या मान्यतेच्या धोरणाचा विषय मा. नियोजन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर....<br>**ठराव** – सर्व विद्याशाखांमधील विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेल्या शिक्षणक्रमांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निकषांनुसार अभ्यासकेंद्र मान्यतेची कार्यवाही विद्यार्थी सेवा विभाग आणि विभागीय संचालक यांच्यामार्फत करण्यात यावी.<br>विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निकषांचे पालन करताना प्रत्येक विषय स्वतंत्र गृहीत न धरता पारंपरिक विद्यापीठाच्या एखाद्या पदवी /पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमाची मान्यता असल्यास इतर समकक्ष/समतुल्य शिक्षणक्रमांसाठी तीच मान्यता गृहीत धरण्यात यावी. उदाहरणार्थ, बी.ए.साठी एकच निकष लावून त्याद्वारे बी.ए. स्पेशलायझेन, बी.कॉम.साठी दिलेल्या अभ्यासकेंद्रामार्फत बी.कॉम. स्पेशलायझेन, विज्ञान विद्याशाखेच्या बी.एस्सी. फिजीक्सच्या अभ्यासकेंद्राला बी.एस्सी. मॅथ्यस तसेच बी.एस्सी. बायोलॉजी दिल्यानंतर तेथेच बी.एस्सी. बॉटनी, झुओलॉजी असे अभ्यासकेंद्रे देता येतील. त्याचप्रमाणे एम.एस्सी. शिक्षणक्रमांसाठी एखाद्या अभ्यासकेंद्र बी.एस्सी.चे केंद्र 7 वर्षांपासून असेल आणि त्या अभ्यासकेंद्राला /कॉलेजला 2 वर्षापूर्वी एम.एस्सी.ची मान्यता मिळाली असेल अशा अभ्यासकेंद्राला मान्यता देण्यात यावी असे ठरले.<br>नवीन शिक्षणक्रमांसाठी दूरशिक्षण परिषदेकडे PPR, PDF forms पाठवून मान्यता घेण्यात यावी. रु. 40,000/- पेक्षा अधिक शुल्कासाठी वित्त समितीमार्फत मान्यता घ्यावी, सदर शुल्क रचना करताना अभ्यासकेंद्राचा प्रतिनिधी समितीत घ्यावा किंवा अभ्यासकेंद्र प्रतिनिधींचा अभिप्राय/मत विचारात घ्यावे, असे सुचित केले.<br>काही अभ्यासकेंद्रांवरील अनुचित/गैरप्रकारांमुळे विद्यापीठाची विद्यापीठाची समाजातील प्रतिमा मलीन होते यावर सद्यस्थितीतील संवेदनशील अभ्यासकेंद्रांची यादी विभागीय केंद्रांमार्फत मागविली जावीत, अशा अभ्यासकेंद्रांची पाहणी करून दोषी आढळल्यास अभ्यासकेंद्र मान्यता रद्द करण्याची कार्यवाही करण्यात यावी असेही सुचित केले.<br>सर्व सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावांना सर्वानुमते मान्यता दिली. |

| | | |
|---|---|---|
| | 46.4.4<br>संगणक विज्ञान विद्याशाखा | **संगणकशास्त्र विद्याशाखेअंतर्गत 2024-25 मध्ये राबविण्यात आलेल्या शिक्षणक्रमांचा आढावा मा. नियोजन मंडळासमोर सादर....**<br>**टिपणी** – संगणक शास्त्र विद्याशाखेअंतर्गत 2024-25 मध्ये राबविण्यात आलेल्या शिक्षणक्रमांचा आढावा मा. नियोजन मंडळासमोर सादर.... |
| | | **ठराव** – 2024-25 मध्ये राबविण्यात आलेल्या शिक्षणक्रमांसाठी मा. नियोजन मंडळाने अभिनंदन केले.<br>तसेच NEP2020 नुसार राबवावयाच्या B.Sc. (Hons) (Data Science), BCA आणि B.Sc. (Industrial Automation) शिक्षणक्रमांच्या शिक्षणक्रम संरचना आणि पाठ्यक्रमाला तसेच अध्ययन साहित्य विकसनासाठीच्या लेखक-संपादकांच्या यादीस मान्यता देण्यात आली. तसेच सदर शिक्षणक्रमांच्या Program Proposal Form (PPF), Program Development Form (PDF) and Program Project Report (PPR) या प्रपत्रांना नियोजन मंडळाच्या सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 46.4.5<br>आरोग्य विज्ञान विद्याशाखा | **आरोग्य विद्याशाखा अंतर्गत 2024-25 मध्ये राबविण्यात आलेल्या M.A. Yoga या शिक्षणक्रमाचा आणि या शिक्षणक्रमासाठी दिलेल्या सद्यस्थितीतील अभ्यासकेंद्रे आणि नव्याने दिलेल्या अभ्यासकेंद्रांचा आढावा मा. नियोजन मंडळासमोर सादर....**<br>**टिपणी** – आरोग्य विज्ञान विद्याशाखेमार्फत 2024-25 मध्ये राबविण्यात आलेल्या M.A. Yoga या शिक्षणक्रमासाठी 2025-26 मध्ये नवीन अभ्यासकेंद्रे देण्यात आली. सदर अभ्यासकेंद्रांचा आढावा मा. नियोजन मंडळासमोर सादर....<br>**ठराव** – आरोग्य विज्ञान विद्याशाखेमार्फत राबविण्यात आलेल्या M.A. Yoga या शिक्षणक्रमासाठी 2025-26 मध्ये नव्याने मान्यता दिलेल्या नवीन अभ्यासकेंद्रांचा आढावा सादर केला. विद्याशाखेने सादर केलेल्या आढाव्यास मा. विद्वत परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |

**46वी नियोजन मंडळ पुरवणी बैठकीचे कार्यवृत्त पुढील पृष्ठापासून**

## 46वी नियोजन मंडळ पुरवणी बैठक

# कार्यवृत्त

**सोमवार 11.08.2025** **सकाळी 11.30 वाजता**

| | | |
|---|---|---|
| 46.2.0 | 46.2.1 | **दि. 29 जुलै 2025 रोजी आयोजित नियोजन मंडळाची पुरवणी बैठक दि. 11 ऑगस्ट 2025 रोजी आयोजित केल्याने 29 जुलै 2025च्या बैठकीचे आणि 11 ऑगस्ट 2025 रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त एकत्रितपणे सादर करून या दोन्ही बैठकीचे कार्यवृत्त व कार्यवाहीचे अहवाल नियोजन मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करण्यात येतील.**<br>**ठराव** – सदस्य सचिव श्री. भरड यांनी 46 व्या नियोजन मंडळ बैठक ही स्थगित करण्यात आली होती त्याची पुरवणी बैठक दि. 11 ऑगस्ट रोजी होत आहे. सबब दि. 29 जुलै 2025 रोजी झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त आणि पुरवणी बैठकीचे इतिवृत्त एकत्रितरित्या सादर करण्यात येईल असे सदस्य सचिव श्री. भरड यांनी नियोजन मंडळाच्या सन्माननीय सदस्यांना अवगत करून दिले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 46.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 46.3.8<br>संगणक शास्त्र विद्याशाखा | **संगणकशास्त्र विद्याशाखेमार्फत सन 2024-25 मध्ये राबविण्यात आलेले शिक्षणक्रम व कार्यवाही तसेच 2025-26 या वर्षात नव्याने सुरू करावयाच्या शिक्षणक्रमांची यादी, मा. नियोजन मंडळाच्या अवलोकन व मान्यतेस्तव सादर**<br>**टिपणी** – संगणकशास्त्र विद्याशाखेमार्फत 2024-25 मध्ये राबविण्यात आलेल्या व 2025-26 या सुरू करण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांच्या खालील मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी व मान्यतेसाठी मा. नियोजन मंडळासमोर सादर....<br>1) Item PB/SCS/01/2025: Action Taken related to programmes on offer during Academic year 2024-2025<br>2) Item PB/SCS/02/2025: Approval to New programmes to be launched from A.Y. 2025-26<br>3) Item PB/SCS/03/2025: New Learner Support Centre (LSC) Recognition Policy<br>4) Item PB/SCS/04/2025: Planning regarding Teaching/Learning/Evaluation<br>5) Item PB/SCS/05/2025: Approval to PPF, PDF and PPR forms for new programmes launched from A.Y. 2024-25 and to be launched from A.Y. 2025-26<br>6) Item PB/SCS/06/2025: Planning regarding Academic Programmes<br>**ठराव** – संगणक विद्याशाखेमार्फत 2025-26 या वर्षापासून B.C.A. आणि M.C.A. हे दोनही शिक्षणक्रम ऑनलाईन मोडद्वारे सुरू करण्यात येणार आहेत. त्याची कार्यवाही सुरू आहे. BCA, B.Sc. Data Science आणि M.C.A. हे तिन्ही शिक्षणक्रम NEP२०२० च्या धोरणानुसार 2025-26 पासून सुरू करण्यात येणार आहेत. Open Electives अंतर्गत Digital Literacy and Cyber Hygiene राबविण्यात येणार आहे. हाच शिक्षणक्रम सगळ्या विद्याशाखांकडे NEP2020 नुसार पर्यायी अभ्यासक्रम म्हणून देण्याविषयीची सूचना संगणक विद्याशाखेला देण्यात आली. तसेच इतर सर्व विद्याशाखांसाठी पर्यायी विषयांच्या यादीमध्ये कृषीचेही विषय |

| | | |
|---|---|---|
| | | देण्याची सूचना करण्यात आली. भविष्यातील AIची गरज लक्षात घेऊन Basics of AI शिक्षणक्रम राबविण्यात यावा. सध्याच्या AI for Everyone या शिक्षणक्रमात ही दुरुस्ती करावी. दोन क्रेडीटचा AI for Every Day Life हा कोर्स तयार करण्यात यावा. त्यात एक क्रेडीट हे सर्वांसाठी कॉमन असावे व त्यात AI Basics कव्हर करण्यात यावे. दुसरे क्रेडीट हे AI Tools चे असावे व ते प्रत्येक ग्रूपसाठी वेगवेगळे असावे (जसे शेतकरी, गृहिणी, सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी, कार्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, इत्यादी). इतर सर्व नियोजित विषयांना तसेच सादर केलेल्या PPF, PDF आणि PPR forms यांना नियोजन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांकडून मान्यता देण्यात आली. |
| | 46.3.9<br>निरंतर<br>विद्याशाखा | **निरंतर शिक्षण विद्याशाखेमार्फत सन 2024-25 मध्ये राबविण्यात आलेले शिक्षणक्रम व कार्यवाही तसेच 2025-26 या वर्षात नव्याने सुरू करावयाच्या शिक्षणक्रमांची यादी मा. नियोजन मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** — निरंतर शिक्षण या विद्याशाखेमार्फत 2024-25 मध्ये राबविण्यात आलेल्या व 2025-26 या सुरू करण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांच्या खालील मुद्यांवर चर्चा करण्यासाठी व मान्यतेसाठी मा. नियोजन मंडळासमोर सादर....<br>• सन 2024-25 या वर्षी राबविण्यात आलेले शिक्षणक्रम सोबत जोडले आहे.<br>• सन 2025-26 या वर्षी नव्याने सुरू करण्यात येणारे शिक्षणक्रम खालीलप्रमाणे<br>1. B.Sc. Media Graphics and Animation<br>2. B.Sc. Hospitality Studies<br>3. B.Sc. Fire and Industrial Safety (Honors)<br>• नव्याने द्यावयाची अभ्यासकेंद्रे यासंबंधीचे धोरण — नव्याने अभ्यासकेंद्रे सुरू करण्यासाठी अभ्यासकेंद्रांकडून Recognition As A Study Centre : Process Manual प्रमाणे कागदपत्रांची फाईल विद्याशाखेत मागविण्यात येते, सदर फाईलची पुर्ण चौकशी (Scrutiny) करून ऑनलाईन किंवा ऑफलाईन तपासणी (Inspection) करून त्यांना मान्यता देण्यात येते.<br>**ठराव** — वरील सर्व शिक्षणक्रमांसाठी दूरशिक्षण परिषदेची मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार 2025-26 मध्ये सुरू करण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांना नियोजन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांकडून मान्यता देण्यात आली. तसेच अभ्यासकेंद्रे मान्यतेच्या धोरणासही मा. नियोजन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 46.3.10<br>ग्रामीण विकास<br>व उद्योजकता | **ग्रामीण विकास व उद्योजकता विद्याशाखेमार्फत 2025-26 या वर्षात नव्याने सुरू करावयाच्या शिक्षणक्रमांची यादी मा. नियोजन मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** — ग्रामीण विकास व उद्योजकता या विद्याशाखेमार्फत 2025-26 या वर्षात सुरू करण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमाच्या मान्यतेसाठी मा. नियोजन मंडळासमोर सादर...<br>**ठराव** — ग्रामीण विकास विद्याशाखेमार्फत राबविण्यात येणाऱ्या 2 क्रेडीट पॉईंटच्या आपत्ती व्यवस्थापन पदविका आणि 16 क्रेडीट पॉईंटच्या पदविका शिक्षणक्रमास मा. नियोजन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |

46.3.11
स्कूल ऑफ डिजीटल एज्युकेशन

**स्कूल ऑफ डिजीटल एज्युकेशन या विद्याशाखेमार्फत 2025-26 या वर्षात नव्याने सुरू करावयाच्या शिक्षणक्रमांची यादी मा. नियोजन मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर...**

**टिपणी** — स्कूल ऑफ डिजीटल एज्युकेशन या विद्याशाखेमार्फत 2025-26 या वर्षात नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमाच्या मान्यतेसाठी मा. नियोजन मंडळासमोर सादर...

**ठराव** — स्कूल ऑफ डिजीटल एज्युकेशनमार्फत 2025-26 या वर्षात ऑनलाईन M.B.A., M.C.A., B.C.A. आणि B.Com. या 2 पदवी आणि 2 पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांसोबत पुढील वर्षात 1) भारतीय दर्शनशास्त्राचा परिचय 2) उद्योजकता विकाससासाठी डिझाईन थिंकींग 3) शिक्षकांसाठी ए.आय. 4) कृतिसंशोधन 5) Introduction to Basic of Marketing आणि 6) Consumer Behavior असे 6 प्रमाणपत्र शिक्षणक्रम विकसित करून ऑनलाईन उपलब्ध करून दिले जाणार आहेत. स्कूल ऑफ डिजीटल एज्युकेशन ही विद्याशाखा facilitator म्हणून काम करणार. ODL शिक्षणक्रम ऑनलाईनमध्ये रुपांतर करून उपलब्ध करून देण्याचे काम या विद्याशाखेने करणे अपेक्षित आहे. काही शिक्षणक्रम 2 क्रेडीट पॉईंटचे महाज्ञानदीपमार्फत राबविण्याची प्रक्रिया सुरू आहे. या शिक्षणक्रमांना मा. नियोजन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली.

46.3.12
व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखा

**व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास या विद्याशाखेमार्फत 2025-26 या वर्षात नव्याने सुरू करावयाच्या शिक्षणक्रमांची यादी मा. नियोजन मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर...**

**टिपणी** — शैक्षणिक वर्ष 2025-26 मध्ये व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखे अंतर्गत खालील शिक्षणक्रम सुरु करण्यात येणार आहेत ते मा. नियोजन मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर....

| S. N | Program Name | Level |
|---|---|---|
| 1 | Certificate in Fundamentals of Wind Energy & Turbine Technology | Certificate |
| 2 | Certificate in Wind Farm Safety & Compliance | Certificate |
| 3 | Certificate in Solar PV technology & Installation | Certificate |
| 4 | Certificate in Repair & Maintenance of Heavy Earthmoving Machines | Certificate |
| 5 | Diploma in Solar PV Technology Operations and Maintenance | Diploma |
| 6 | Diploma in Renewable Energy Safety Inspectors & Operations Managers | Diploma |
| 7 | Advanced Diploma in Wind Technology & Management | Diploma |
| 8 | Certificate in Wind Turbine Installation and Commissioning | Certificate |

2. Orientation Program in Driving & Skill Development हा शिक्षणक्रम देखील विद्याशाखेंतर्गत विकसित करण्यात येत आहे, जो विद्यापीठ JNPA सोबत करार करून सुरु करणार आहे आणि हा शिक्षणक्रम १५ ऑगस्ट पासून राबविण्यात येणार आहे.
3. शैक्षणिक वर्ष 2026-27 मध्ये व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखे अंतर्गत खालील 10 शिक्षणक्रम सुरु करण्यात येणार आहेत.

   1. Customs Clearance & Freight,

| | | |
|---|---|---|
| | | 2. Warehousing & Inventory Management,<br>3. Marine Terminal Operations Management,<br>4. Ship Chandling, & Supply Chain Management,<br>5. Certificate Course in Office Management,<br>6. Certificate in Container / Crane Driver Training Program,<br>7. Certificate course in Soft Skills,<br>8. Diploma in Logistic & Port Management,<br>9. Diploma Seafarers Club Hospitality Management,<br>10. BBA-Port Management<br>**ठराव** – व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विद्याशाखेमार्फत 2025-26 मध्ये 8 शिक्षणक्रम सुरू करण्यात आले आहेत. त्यांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. तसेच JNPA आणि BVG यांचेसोबत झालेल्या सामंजस्य कराराअंतर्गत Orientation Program in Driving & Skill Development हा शिक्षणक्रम देखील सुरू करण्यात आला आहे. 2026-27 मध्ये वरील यादीतील 8 विविध प्रमाणपत्र, पदविका आणि BBA Port Management हा पदवी शिक्षणक्रम सुरू करण्यात येणार आहे. या शिक्षणक्रमांसोबत विद्याशाखेमार्फत 'Dry Port Management' हा शिक्षणक्रमही सुरू करण्यात यावा अशी सूचना केली. व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विद्याशाखेमार्फत प्रस्तावित केलेल्या शिक्षणक्रमांना मा. नियोजन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 46.3.13<br>आरोग्य विज्ञान विद्याशाखा | **आरोग्य विज्ञान या विद्याशाखेमार्फत 2025-26 या वर्षात नव्याने सुरू करावयाच्या शिक्षणक्रमांची यादी मा. नियोजन मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – शैक्षणिक वर्ष 2025-26 मध्ये आरोग्य विज्ञान या विद्याशाखेअंतर्गत खालील शिक्षणक्रम सुरु करण्यात येणार आहेत ते मा. नियोजन मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर...<br>1. Certificate Programme in Applied Counselling skills and techniques<br>2. Diploma in Sur Sanjeevan (Curative Music)<br>3. MA Counselling and Mental Wellbeing<br>**ठराव** – आरोग्य विद्याशाखेमार्फत 2025-26 मध्ये Certificate Programme in Applied Counselling skills and techniques प्रमाणपत्र, Diploma in Sur Sanjeevan (Curative Music) पदविका आणि M.A. Counselling and Mental Wellbeing हे शिक्षणक्रम प्रस्तावित केले आहेत. यातील MA Counselling and Mental Wellbeing या शिक्षणक्रमाच्या नावातील Mental हा शब्द काढून या शिक्षणक्रमाचे नाव 'MA Counselling and Wellbeing' असे करण्यात यावे अशी सूचना केली. यापुढे वरील शिक्षणक्रमांचे PPR, PDF, ABCD forms सुधारित नावाने करावे असे सुचविण्यात आले. विद्याशाखेमार्फत प्रस्तावित केलेल्या शिक्षणक्रमांना मा. नियोजन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 46.3.14<br>कृषी विज्ञान विद्याशाखा | **कृषिविज्ञान विद्याशाखा परिषद व विद्वत परिषदेने मान्यता दिलेले विविध शिक्षणक्रमांचे PPF, PPR, PDF इत्यादी Form नियोजन मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर**<br>**टिपणी** –<br>1. श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या Concept Note, Programme Proposal Form (PPF), Programme Project Report (PPR) आणि Programme Development Form (PDF) ला कार्योत्तर मान्यता |

| | | |
|---|---|---|
| | | 2. अन्न विज्ञान आणि प्रक्रिया प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या Programme Development Form (PDF) ला कार्योत्तर मान्यता<br>3. अन्न विज्ञान आणि प्रक्रिया पदविका शिक्षणक्रमाच्या Programme Development Form (PDF) ला कार्योत्तर मान्यता<br>4. माती विना शेती प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या Programme Development Form (PDF)ला कार्योत्तर मान्यता<br>**ठराव** — कृषी विद्याशाखेमार्फत वरील सर्व शिक्षणक्रमांचे Concept Note, PPF, PPR, PDF, ABCD forms यांना मा. नियोजन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. श्वानपालक प्रबोधन आणि मातीविना शेती या शिक्षणक्रमांचे शुल्क खूप जास्त असल्याचे अभिप्राय प्राप्त झाल्यामुळे त्यानुसार या शिक्षणक्रमांचे शुल्क कमी करण्याबाबतचा प्रस्ताव मांडण्यात आला. श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रमाचे नियोजित केलेले एकूण शुल्क रु. 14940/- इतके होते. त्यात सुधारणा करून सुधारित एकूण शुल्क रु. 6940/- इतके करण्यात यावे. मातीविना शेती प्रमाणपत्र शिक्षणक्रमाचे नियोजित केलेले एकूण शुल्क रु. 12100/- इतके होते. त्यात सुधारणा करून सुधारित एकूण शुल्क रु. 5480/- इतके करण्यात यावे. यास मा. नियोजन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 46.3.15<br>**मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा** | **मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेमार्फत 2025-26 या वर्षात नव्याने सुरू करावयाच्या शिक्षणक्रमांना मान्यता तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्यात आलेल्या अध्ययन साहित्य विकसन व अध्ययन साहित्य खर्चास मा. नियोजन मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...**<br>**टिपणी** —<br>1. सन 2024-25 यावर्षी राबविण्यात आलेल्या एम.ए. मराठी (M49), एम.ए. हिंदी (M85), एम.ए. उर्दू (M48), एम.ए. अर्थशास्त्र (M50), एम.ए. इतिहास (M60), एम.ए. लोकप्रशासन (M58) पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांचे विकसन तसेच इंग्रजी (M87), समाजशास्त्र (M86), मानसशास्त्र (M89), राज्यशास्त्र (M88), जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या (M90) या पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांसाठी विकास पब्लिकेशन्सकडून अध्ययन साहित्य विकत घेण्यासाठी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता<br>2. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास व लोकप्रशासन या चार वर्ष कालावधीच्या सर्व ऑनर्स व एक वर्षाच्या पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांच्या विकसनासाठी येणाऱ्या खर्चास तसेच PDF, PPR ला मान्यता<br>3. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार इंग्रजी, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या, समाजकार्य या विषयांत चार वर्षाच्या बी.ए. (ऑनर्स) पदवी व एक वर्षाच्या पदव्युत्तर पदवी आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र (बी.लिब) पदवी आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात पदव्युत्तर (एम.लिब.) पदवी शिक्षणक्रमांचे शैक्षणिक वर्ष 2025-26 पासून विकसनाची कार्यवाहीसाठी येणाऱ्या खर्चास तसेच PDF, PPR ला मान्यता<br>4. विद्यापीठाने शैक्षणिक संस्थेबरोबर केलेल्या तांत्रीक सहाय्याच्या संद्रभात सामंजस्य कराराअंतर्गत मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतून (एम.ए.) इंग्रजी |

| | | |
|---|---|---|
| | | पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम ऑनलाईन पद्धतीने राबविण्यास तसेच PDF, PPR ला मान्यता<br>5. 'समुदाय प्रतिबद्धता : शहरी व ग्रामीण विकास पदविका' हा शिक्षणक्रम सुरू करण्यास मान्यता<br>6. सद्य:स्थितीतील अभ्यासकेंद्रांचे नुतनीकरण, नव्याने द्यावयाची अभ्यासकेंद्रे यासंबंधीचे धोरणास मान्यता<br>वरील विषय मा. नियोजन मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर....<br>**ठराव** — मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेमार्फत चार वर्षाचे पदवीपूर्व आणि एक वर्षाच्या पदव्युत्तर पदवी यासाठी येणाऱ्या खर्चासाठी, सामंजस्य कराराअंतर्गत घेण्यात येणाऱ्या तांत्रिक सहाकार्यासाठी येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.<br>'समुदाय प्रतिबद्धता : शहरी व ग्रामीण विकास पदविका' हा शिक्षणक्रम ग्रामीण विकास व उद्योजका या विद्याशाखेमार्फत सुरू करण्यास यावा असे सुचित करण्यात आले. त्यामुळे मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतून करण्यात येणारे विकसन मागे घेण्यास मान्यता देण्यात आली. हा शिक्षणक्रम मागे घेण्यात आल्याचे येणाऱ्या विद्याशाखा परिषदेत मांडून अवगत करून देण्याबाबतही सुचना करण्यात आली.<br>सद्य:स्थितीतील अभ्यासकेंद्रांचे नुतनीकरण, नव्याने द्यावयाची अभ्यासकेंद्रे यासंबंधीचे धोरणास मान्यता प्रदान करण्यात आली. |
| 46.4.0 | | **मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळेचे विषय** |
| | 46.4.6<br>RPL सेंटर | **YCMOU Policy and Procedure for Recognition of Prior Learning (RPL Policy) मा. नियोजन मंडळाच्या अवलोकनार्थ आणि मान्यतेसाठी सादर ...**<br>**टिपणी** — YCMOU Policy and Procedure for Recognition of Prior Learning मा. नियोजन मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** — विद्यापीठ अनुदान आयोगाने उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध होण्यासाठी पूर्व कौशल्य आणि अनुभवाद्वारे काही पदवी व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांमध्ये क्रेडीट पॉईंटची सूट देण्याची तरतूद त्यांच्या मार्गदर्शिकेमध्ये दिली आहेत.<br>पदवी अभ्यासक्रमांमध्ये पूर्व शिक्षणाची मान्यता (Recognition of Prior Learning — RPL) समाविष्ट करणे म्हणजेच उच्च शिक्षणातील प्रवेशयोग्यता आणि लवचिकता वाढवण्यासाठी, पूर्व शिक्षणाची मान्यता (RPL) पदवी अभ्यासक्रमांमध्ये पद्धतशीरपणे समाविष्ट केली पाहिजे. RPLच्या माध्यमातून शिकणाऱ्यांना पारंपरिक वर्गखोल्यांच्या बाहेर मिळालेले अनौपचारिक, अपारंपरिक आणि अनुभवाधारित शिक्षण यासाठी औपचारिक शैक्षणिक श्रेय (Academic Credit) दिले जाऊ शकते. पूर्वी मिळवलेल्या कौशल्यांचे अभ्यासक्रमातील उद्दिष्टांशी संलग्न करून पदवी शिक्षणक्रमांसाठी प्रवेश देण्यास विद्यार्थी पात्र ठरू शकतो. याला Recognition of Prior Learning अशी संज्ञा आहे.<br>विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार Integration of Prior Learning in Degree Programme करता येते. यामध्ये शिक्षणक्रमाच्या एकूण श्रेयांकांपैकी 30% पर्यंत पूर्व शिक्षणाच्या माध्यमातून प्राप्त ज्ञान व कौशल्यांना संबंधित शिक्षणक्रमांच्या ध्येय / Outcomes सुसंगत ज्ञान / कौशल्य समकक्षता मूल्यमापनाद्वारे सिद्ध होत असेल तर सुट देता येईल. यासाठी विद्यापीठातील सर्व विद्याशाखांनी दरवर्षी त्यांचे RPC अंतर्गत 30% पर्यंत श्रेयांकासाठी उपलब्ध पदवी शिक्षणक्रम जाहीर करणेस आणि विद्यार्थ्यांना तसे अवगत करावे. या RPC प्रक्रियेची माहिती व्हावी यास्तव पूर्व शिक्षणाच्या मान्यतेसाठी मार्गदर्शक पुस्तिका उपब्ध करण्यात येणार |

| | | |
|---|---|---|
| | | असून त्यानुसार विद्यार्थी संख्या वाढीसाठी विद्याशाखांनी कार्यवाही करावी, अशीही चर्चा करण्यात आली.<br>याचबरोबर NSQF च्या लेवल 1 ते 4 च्या मान्यतेसाठी NCVET कडे प्रस्ताव सादर करण्यात आल्याचे आणि त्यास लवकरच मान्यता मिळेल असे मा. कुलगुरू यांनी माहिती दिली. NCVET ची मान्यता मिळाल्यास पूर्वतयारीच्या माध्यमातून ज्याप्रकारे विद्यार्थी विद्यापीठात प्रवेश घेत होते त्याचप्रमाणे या मान्यतेनंतर घडेल असे मत प्रा. डॉ. राम ठाकर यांनी व्यक्त केले. चर्चेनंतर पूर्व शिक्षणाच्या मान्यतेसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ धोरण व कार्यपद्धतीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 46.4.7<br>RPL सेंटर | Establishment of Recognition of Prior Learning (RPL) Assessment Center at Yashwantrao Chavan Maharshatra Open University (YCMOU) मा. नियोजन मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर...<br>**टिपणी** – Establishment of Recognition of Prior Learning (RPL) Assessment Center at Yashwantrao Chavan Maharshatra Open University (YCMOU) पॉलिसीच्या अंतर्गत शिक्षणक्रम राबविण्यासाठी पुढील गोष्टी आवश्यक आहेत.<br>विद्यापीठात एक वेगळ्या सेंटरची गरज भासेल. ज्याद्वारे विद्यापीठाच्या शिक्षणक्रमात समाविष्ट कौशल्यांचे क्रेडीट तपासेल आणि क्रेडीट पॉईंटस् प्रमाणित करण्यात येईल. यासाठी स्वतंत्र University Portal सुरू करण्यात येईल.<br>सध्या विद्यापीठात उपलब्ध असलेल्या व्यावसायिक शिक्षणक व कौशल्य विकास विद्याशाखेमध्ये RPL साठीचे सेंटर सुरू करण्यात यावे. विद्यापीठाच्या पोर्टलवर सर्व माहिती उपलब्ध करण्यात यावी. आवश्यक फॉर्मस् उपलब्ध करून द्यावे ज्याद्वारे विद्यार्थ्यांना अवगत करता येईल. मा. नियोजन मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** – डॉ. राम ठाकर यांनी केलेल्या विस्तृत विवेचनाद्वारे RPL ही संकल्पनेबाबत माहिती मिळाली. RPL ही संकल्पना मांडणारे आणि राबविणारे हे विद्यापीठ महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ आहे. याची संपूर्ण मार्गदर्शन पुस्तिका प्रत्येक विद्याशाखेला पाठविली जाईल. विद्याशाखांनी यानुसार कार्यवाही करावी.<br>नव्याने स्थापन करण्यात येणाऱ्या RPLAC पुढील सविस्तर कार्यवाही पूर्व शिक्षणाच्या मान्यतेसाठी YCMOU Policy & Procedure नुसार कार्यवाही करेन. पूर्व शिक्षणाच्या माध्यमातून Level 1 to 4 आणि Integration of Prior Learning in Degree Programme अंमलबजावणी केल्यास याबाबत पूर्व ज्ञान, अनुभव व कौशल्य प्राप्त विविध क्षेत्रातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी उपयुक्त ठरेल आणि यामुळे Gross Enrollment Ratio (GER) वाढण्यास मदत होईल. |
| | 46.4.8<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा | **शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत 11 प्रमाणपत्र शिक्षणक्रम, 2 पदविका शिक्षणक्रम तसेच बी.एड. विशेष शिक्षणक्रम आणि एम. ए. शिक्षणशास्त्र, शालेय व्यवस्थापन पदविका, बालसंगोपन आणि रंजन शिक्षणक्रमांची पुनर्रचना आणि Mooc Development प्रस्ताव मा. नियोजन मंडळापुढे मार्गदर्शन आणि मान्यतेस्तव सादर ...**<br>**टिपणी** – शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत 2025-26 या शैक्षणिक वर्षात पुढे नमूद प्रमाणपत्र शिक्षणक्रम नव्याने विकसित करण्यात येणार आहेत.<br>1. समावेशित शिक्षण<br>2. अध्यय अक्षमता<br>3. मूलभूत भारतीय सांकेतिक भाषा |

| | | |
|---|---|---|
| | | 4. समावेशित शिक्षणासाठी क्रॉस दिव्यांगत्व आणि शीघ्र हस्तक्षेपण<br>5. संप्रेषणात्मक इंग्रजी<br>6. प्रगत अध्यापनशास्त्र<br>7. गणितीय आणि तांत्रिक कौशल्य<br>8. बोधात्मक अध्ययन<br>9. अनुदेशन अभिकल्प<br>10. पालकत्व आणि<br>11. स्वयंसहाय्यता समुह प्रमाणपत्र शिक्षणक्रम: प्रगत),<br>पदविका शिक्षणक्रम नव्याने विकसित करण्यात येणार आहेत.<br>1. उच्च शिक्षण आणि<br>2. मार्गदर्शन आणि समुपदेशन<br>पुढील शिक्षणक्रमांची पुनर्रचना करण्यात येत आहे.<br>1. बी.एड. विशेष शिक्षण (HI / VI / ID),<br>2. एम.ए. शिक्षणशास्त्र,<br>3. शालेय व्यवस्थापन<br>4. बालसंगोपन आणि रंजन शिक्षणक्रम,<br>5. पीएच.डी. शिक्षणक्रम (शिक्षणशास्त्र आणि दूरशिक्षण)<br>Mooc Development अंतर्गत शिक्षणक्रम<br>1. शिक्षकांसाठी A.I., आणि<br>2. उद्योजकता विकासासाठी डिझाईन थिंकींग<br>असे शिक्षणक्रम सुरू 2025-26 पासून करणेबाबतचा प्रस्ताव मा. नियोजन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** – शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालकांनी प्रस्तावित केलेल्या वरील सर्व शिक्षणक्रमांना PPR, PDF, ABCD forms पुढील सभेत सादर करण्यात यावेत अशा सुचनेसह मा. नियोजन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 46.4.9<br>आस्थापना कक्ष | **शिक्षक व शिक्षकेतर पदांचा सुधारीत आकृतीबंध अवलोकनास्तव प्रस्ताव ...**<br>**टिपणी** – मा. मुख्यमंत्री महोदयानी 150 दिवसांच्या कार्यक्रामध्ये सर्व विद्यापीठांचे आकृतीबंधात सुधारणा करून सुधारित आकृतीबंध 150 दिवसांत सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार प्रशासनाने शिक्षक व शिक्षकेतर पदांचा सुधारीत आकृतीबंध नियोजन मंडळाच्या अवलोकनास्तव सादर ...<br>**ठराव** – प्रशासनाने आकृतीबंधाचा कच्चा मसुदा तयार केला आहे. त्यावर सध्या काम सुरू आहे. आकृतीबंधाचा कच्चा मसुदा मा. व्यवस्थापन मंडळासमोरही सादर केला जाणार आहे. सन 1989मध्ये शिक्षक व शिक्षकेतर पूर्वीची एकूण 350 पदे मंजूर केलेली आहेत. त्यातून 9 पदे (गट-ड मधील शिपाई) निरसित करण्यात आली होती. आता सध्या शासनमान्य एकून 341 पदे आहेत.<br>विद्यापीठाच्या कामाचा आढावा घेऊन व भविष्यातील वाटचालीचा विचार करून मनुष्यबळाची वाढती गरज लक्षात घेता आणि Distance Education Beruau यांच्या निकषांनुसार नवीन आकृतीबंधाद्वारे शिक्षक पदांमधील सहयोगी प्राध्यापकांमधील 8 पदे निरसित करण्यात येत आहे आणि 32 पदे निर्माण करण्यात येत आहेत. तसेच शिक्षकेतर पदांमधील 31 पदे निरसित करण्यात येत आहे आणि शिक्षकेतर पदांची एकूण 65 वाढीव पदे प्रस्तावित करीत आहेत. |

| | | |
|---|---|---|
| | | शासनाने 3 विद्यापीठांच्या कायद्यात सुधारणा करण्यासाठी समिती गठीत केलेली आहे. या गठीत समितीपुढेही आकृतीबंध प्रस्तावित केला जाईल.<br>आकृतिबंधाच्या सादर केलेल्या आढाव्यास तसेच पुढील कार्यवाहीस्तव मा. नियोजन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 46.4.10 | **मा. नियोजन मंडळाचे स्नमाननीय सदस्य डॉ. अविनाश चौधरी यांनी सादर केलेला मा. कुलगुरूंच्या अभिनंदनाचा प्रस्ताव ....**<br>**टिपणी** – नियोजन मंडळाचे सन्माननीय सदस्य डॉ. अविनाश चौधरी हे दोन्ही बैठकींमध्ये ऑनलाईन झूम मिटींगद्वारे उपस्थित राहून त्यांनी चर्चेत सहभाग घेतला. त्यांनी बैठकीत 'बैठकीमध्ये सादर केलेल्या चर्चेदरम्यान मा. कुलगुरूंची मुक्त विद्यापीठाशी असलेली बांधिलकी लक्षात येते. मा. कुलगुरूंच्या vision & ideology द्वारे विद्यापीठात वेगवेगळे कौशल्यआधारित शिक्षणक्रम सुरू होत आहेत. 7 वी 8 वी पासून ते 12 वी नंतर विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी विविध कौशल्यांवर आधारीत शिक्षणक्रम विकसित करणे, संस्कृत भाषा अध्ययन ते Digital Education इतक्या व्यापक क्षेत्राचा विचार करून विद्यापीठ समाजापर्यंत नेऊन मुक्त विद्यापीठ हे Digital University होण्याची वाटचाल करीत आहे. भविष्यातील शिक्षणाच्या संधींचा विचार करून रोजगाराभिमुख शिक्षणक्रम विकसित करणाऱ्या मा. कुलगुरूंच्या अभिनंदनाचा प्रस्ताव सादर करतो' असा प्रस्ताव डॉ. चौधरींनी नियोजन मंडळापुढे सादर केला.<br>**ठराव** – मा. कुलगुरूंच्यो अभिनंदनाच्या प्रस्तावास मा. नियोजन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मा. कुलगुरूंचे अभिनंदन करून मान्यता प्रदान केली. मा. कुलगुरूंनी यावर हे श्रेय सर्वांचे आहे आणि भविष्यात अनेक आव्हाने पुढे आहेत त्या आव्हांनांना पार करून पुढे जाणे तितकेच महत्त्वाचे आहे असे विचार मांडले. |
| | | 1. नियोजन मंडळाचे सन्माननीय सदस्य डॉ. राम ठाकर यांनी नियोजन मंडळाच्या बैठकीचा उद्देश सांगितला.<br>कोणत्याही विद्याशाखेमार्फत नवीन शिक्षणक्रम राबविण्यापूर्वी त्यांच्या विद्याशाखा परिषदेत शिक्षणक्रमाची संरचना निश्चित करून Programme Advisory Committee कडून मान्य करून नियोजन मंडळात विषय मांडणे गरजेचे आहे. त्याचबरोबर त्या शिक्षणक्रमासाठी आवश्यक खर्चाचा विषय हा वित्त समितीतून मान्य करणे गरजेचे आहे. नियोजन मंडळात शिक्षणक्रमासाठी लागणारी शैक्षणिक पदे, त्यांवरील खर्च, अध्ययन साहित्य विकसित खर्च, अशा वित्तीय बाबींवरही विचार होणे गरजेचे आहे. त्यानंतर सदर विषयाला वित्त समितीचीही मान्यता घेणे गरजेचे असते. नियोजन मंडळात फक्त शिक्षणक्रमांची माहिती न मांडता त्या शिक्षणक्रमांचे ABCD, PPF, PDF and PPR forms नियोजन मंडळापुढे मांडून त्यांची मान्यता घेतल्यानंतरच सदर नवीन शिक्षणक्रम किंवा सुधारित करावयाचा शिक्षणक्रम विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी पाठविणे आवश्यक आहे. नियोजन मंडळ सल्लागाराच्या भूमिकेत असते आणि विद्वत परिषदेत शैक्षणिक भूमिकेतून मान्यता प्रदान करण्यात येते. सबब प्रथम नियोजन मंडळाची मान्यता घेणे अनिवार्य आहे असे त्यांनी नमूद केले. मा. सदस्यांनी मांडलेल्या सूचनेला सन्माननीय अध्यक्षांनी मान्यता देऊन यापुढे सर्व विद्याशाखा संचालकांनी अशाच प्रकारे कार्यवाही करावी अशी सूचना केली. आतापर्यंत नियोजन मंडळात ABCD, PPF, PDF and PPR forms सादर न करता विद्वत परिषदेची मान्य झालेल्या शिक्षणक्रमांचे ABCD, PPF, PDF and PPR forms नियोजन मंडळात सादर करण्याविषयी सर्व विद्याशाखा संचालकांना सुचित करण्यात आले. |

या बैठकीत हे ABCD, PPF, PDF and PPR forms सादर केले नसलेल्या शिक्षणक्रमांना या बैठकीत तत्वत: मान्यता दिली आहे. ABCD, PPF, PDF and PPR formsची पूर्तता केल्यानंतरच हे शिक्षणक्रम पुढील मान्यतेसाठी विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी ठेवण्यात येतील असेही मा. कुलगुरू तथा अध्यक्ष यांनी विषद केले. त्यानंतर पुन्हा नियोजन मंडळाकडे सर्व ठरावांसहीत सादर करणे अनिवार्य असेल.

सर्व विद्याशाखांसाठी एक चेकलिस्ट तयार करण्यात यावी तसेच नियोजन मंडळाच्या ठरावाच्या मान्यतेनंतरच विद्वत परिषदेत विषय स्विकारण्यात यावेत अशी दक्षता घेण्यात यावी याबाबतचे परिपत्रक काढण्यात यावे अशी सूचना केली.

Programme Advisory Committee मध्ये सदस्यांची संख्या किमान 7 ते कमाल 12 असावी. समितीतील सदस्य पुढीलप्रमाणे असावेत.

1. अध्यक्ष विद्याशाखा संचालक - 1
2. विद्याशाखेतील अंतर्गत - 2 सदस्य
3. मुक्त व दूरशिक्षण विद्यापीठातील - 2 सदस्य
4. संबंधित क्षेत्रातील - 1 सदस्य
5. उद्योग क्षेत्रातील - 1 सदस्य

असे असावे. 7 सदस्यांचे एक मॉडेल असेल. त्यापेक्षा जास्त सदस्य समाविष्ट करावयाचे असतील तर मा. कुलगुरूंच्या मान्यतेने बाकी सदस्य निमंत्रित सदस्य असावेत.

नियोजन मंडळात नवीन शिक्षणक्रमाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव देताना एक मॉडेल, SOP असावे असा विचार मांडण्यात आला. त्यानुसार तशी SOP मांडण्यात येईल.

2. NEP2020 च्या धोरणानुसार सर्व विद्याशाखांमधील वैकल्पिक विषयांसाठी पर्यायी संगणक विद्याशाखेने प्रस्तावित केलेला Open Electives अंतर्गत Digital Literacy and Cyber Hygiene हा शिक्षणक्रम सगळ्या विद्याशाखांकडे NEP2020 नुसार पर्यायी अभ्यासक्रम म्हणून देण्याविषयीची सूचना देण्यात आली. तसेच इतर सर्व विद्याशाखांसाठी पर्यायी विषयांच्या यादीमध्ये कृषीचेही विषय देण्याची सूचना करण्यात आली.

   भविष्यातील AIची गरज लक्षात घेऊन Basics of AI शिक्षणक्रम राबविण्यात यावा. यात 1 क्रेडीटसाठी AI साठीची प्राथमिक माहिती असावी आणि दुसऱ्या क्रेडीटसाठी 10 टूल्सचा विचार करावा. यात प्राथमिक शिक्षक, गृहिणी, शेतकरी, मार्केटिंग सरपंच, ग्रामपंचायत अशा ज्या ज्या समाजातल्या 10 क्षेत्रांतील व्यक्तींना उपयुक्त होईल असे पर्याय या क्रेडिटमध्ये उपलब्ध करून देण्यात यावेत. सध्याच्या AI for Everyone या शिक्षणक्रमात ही दुरुस्ती करावी आणि हा अभ्यासक्रम सगळ्या विद्याशाखांमध्ये 2 क्रेडिटसाठी राबविण्यात यावा.

3. ऑनलाईनद्वारे शिक्षणक्रम उपलब्ध करून देताना अभ्यासकेंद्रांवर नवीन तंत्रज्ञान अवगत असणाऱ्या एका व्यक्तीची नेमणूक केल्यास विद्यार्थ्यांना Teaching Learning Support Facility विद्यार्थ्यांना पुरविता येईल. यासाठी विद्यापीठात व्हर्चुअल क्लासरूम तयार होत आहेत. तेथून विद्यार्थी कोठेही असेल तरी तो virtually क्लास join करू शकतो किंवा त्याला रेकॉर्डींगही उपलब्ध असेल.

4. एखादा शिक्षणक्रम ऑनलाईन मोडद्वारे उपलब्ध करून देण्यासाठी 'डिजिटल एज्युकेशन विद्याशाखेकडे' नियमित विद्याशाखेने काय देणे अपेक्षित आहे याची SOP असायला हवी असे मत मानव्यविद्या विद्याशाखा संचालकांनी मांडले. त्यानुसार विद्याशाखेने डिजिटल एज्युकेशनकडे संबंधित शिक्षणक्रमाचे सिलॅबस, त्यातील तज्ज्ञांची यादी, अभ्यासकेंद्रांची

| | | |
|---|---|---|
| | | यादी 'डिजिटल एज्युकेशन विद्याशाखेकडे' द्यावेत. ऑनलाईन कंटेंट तयार करून घेण्याचे काम डिजिटल एज्युकेशन विद्याशाखा करतील.<br>5. देवळाली कँपमधील आर्टिलरी सेंटरमधील जनरल यांनी प्रस्तावित केल्यानुसार 'Defense & Strategic Studies' आणि 'War Fare' या विषयांवर आधारीत त्यांच्याकडील अधिकाऱ्यांना आपल्या विद्यापीठात संशोधनात्मक पीएच.डी. शिक्षणक्रम करण्याची इच्छा आहे. तसेच केंद्रशासनाच्या 'अग्नीवीर' या संक्लपनेतून अग्नीवीर म्हणून सध्या कार्यरत असणाऱ्या अग्नीवीरांची पहिली तुकडी बाहेर पडेल. अशा अग्नीवीरांना Prior Learning अंतर्गत विद्यापीठाने प्रमाणित करावे म्हणजे त्यांना त्यांच्या भविष्यात उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळेल. यासाठी आर्टिलरी सेंटरचे एक सादरीकरण विद्यापीठात ठेवता येईल आणि देशासाठी एक चांगले कार्य करता येईल असे विचार मा. कुलगुरूंनी मंडळापुढे मांडले.<br>6. विद्यापीठाच्या कायद्यात दिलेली संविधानिक समित्यांची संरचना काळानुसार आणि आवश्यकतेनुसार बदलणे गरजेचे आहे. त्यावेळी तयार केलेल्या नियोजन मंडळ १९८९ मध्ये केले होते. नियोजन मंडळातील संविधानातील सदस्य म्हणून प्र-कुलगुरू, वित्त अधिकारी आणि परीक्षा नियंत्रक सदस्य असावेत. तसेच सगळ्याच विद्याशाखांचे संचालक कायम स्वरुपी निमंत्रित सदस्य म्हणून असावेत अशी सूचना प्रा. राम ठाकर यांनी मांडली. नियोजन मंडळ ही Recommended Body असल्याने सदस्य संख्या वाढल्यास काही अडचण नसावी. त्यानुसार सदस्य संख्या वाढविण्यास मा. कुलगुरू यांनी चर्चेअंती मान्यता दिली. |
| | | वरील सर्व विषयांवर चर्चा होऊन मा. अध्यक्षांच्या मान्यतेने सभा समाप्त करण्यात आली. |

अध्यक्ष
नियोजन मंडळ

सचिव
नियोजन मंडळ